THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 3RD MAY 1894.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

**हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख ८ माहे मार्च सन १८९४ रोजीं मंजूर केला, तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असे :—**

### सन १८९४ चा आक्ट ७.

**सन १८७१ चा कैद्यांचा आक्ट सुधारण्याविषयीं आक्ट.**

ज्याअर्थी सन १८७१ चा कैद्यांचा आक्ट सुधारणें योग्य आहे, त्याअर्थी पुढील-प्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे :—

१. सदरहू आक्टाच्या १ ल्या कलमाच्या शेवटीं पुढील मजकूर दाखल केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें :— सन १८७१ चा आक्ट ५, याच्या १ ल्या कलमांत जास्त मजकूर दाखल करणें.

"या आक्टाच्या ३ ऱ्या किंवा ९ व्या भागांत तुरुंग [प्रिझन] किंवा जेल याविषयीं, किंवा कैदेंत ठेवणें किंवा अटकावून ठेवणें याविषयीं उल्लेख केला असेल त्यांत, सन्मार्गप्रवर्तक स्थळाचा [रेफर्मेटरीचा] किंवा सन्मार्गप्रवर्तक शाळेचा, किंवा अशा स्थळांत किंवा शाळेंत अटकावून ठेवणें याचा समावेश होतो असें समजावें."

२. सदरहू आक्टाचें ९ वें कलम या कलमावरून रद्द केलें असे. सन १८७१ चा आक्ट ५, याचें ९ वें कलम रद्द करणें.

३. सदरहू आक्टाच्या १४ व्या कलमांत, "अथवा सन १८८२ चा इलाक्यांतील स्माल्कॉज कोर्टासंबंधी आक्ट याअन्वयें कलकत्त्यांत किंवा मद्रासेंत किंवा मुंबईंत स्थापलेले कोणतेही कोर्टाचे वारंटावरून," या शब्दांच्या बदला पुढील मजकूर दाखल केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें :— सन १८७१ चा आक्ट ५, याच्या १४ व्या कलमाची सुधारणा.

"अथवा त्या त्या वेळीं अमलांत असणाऱ्या कोणत्याही कायद्याअन्वयें कलकत्ता, मद्रास किंवा मुंबई या शहरांत स्थापलेल्या कोणत्याही दिवाणी कोर्टाच्या वारंटावरून."

४. (१) सदरहू आक्टाच्या १६ व्या कलमांत, "हुकुमावरून काम चालविणारे" या शब्दांच्या बदला, "सामान्य किंवा विशेष हुकुमाअन्वयें, ब्रिटिश इंडियांत किंवा ब्रिटिश इंडियाबाहेर, काम चालविणारे" हे शब्द दाखल केले पाहिजेत. सन १८७१ चा आक्ट ५, याच्या १६ व्या कलमाची सुधारणा करणें व त्या कलमांत जास्त मजकूर दाखल करणें.

(२) त्याच कलमाच्या शेवटीं पुढील मजकूर दाखल केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें :—

" किंवा मलिका माआझमांच्या सार्वभौम सत्तेखालीं असणाऱ्या कोणत्याही एतद्देशीय राजाच्या किंवा संस्थानाच्या कोणत्याही कोर्टानें किंवा न्यायसभेनें केलेला कोणताही शिक्षेचा ठराव किंवा कोणा मनुष्यास अटकेंत ठेवण्याविषयीं दिलेला कोणताही हुकूम किंवा वारंट, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची दरेक बाबतींत अगोदर मंजुरी घेऊन, अमलांत आणण्याचा अधिकार आहे :

" ज्या प्रसंगीं अशा कोणत्याही एतद्देशीय राजाच्या किंवा संस्थानाच्या एकाद्या कोर्टानें किंवा न्यायसभेनें, ब्रिटिश सरकारच्या एकाद्या अमलदाराच्या संमतीवांचून अमलांत आणतां येत नाहीं असा एकादा शिक्षेचा ठराव केलेला असेल, आणि या प्रकरणाचा निकाल करण्यासाठीं नांवानें किंवा हुद्याच्या नात्यानें मुद्दाम अधिकार दिलेल्या सदरील प्रकारच्या कोणत्याही अमलदारानें न्यायाच्या रीतीनें अशा ठरावाचा विचार त्याच्या गुणदोषांवरून करून तो बहाल केला असेल, तेव्हां असा ठराव, व त्याला अनुसरून दिलेला कोणताही हुकूम किंवा वारंट हीं, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या हुकुमाअन्वयें काम चालविणाऱ्या कोर्टानें किंवा न्यायसभेनें केलेला शिक्षेचा ठराव किंवा दिलेला हुकूम किंवा वारंट असल्याप्रमाणें मानलीं पाहिजेत."

सन १८७१ चा आक्ट ५, याच्या १९ व्या कलमाची सुधारणा करणें व त्या कलमांत जास्त मजकूर दाखल करणें.

९. (१) सदरहू आक्टाच्या १९ व्या कलमांतील पहिल्या त्रेपन शब्दांच्या बदला पुढील मजकूर दाखल केला पाहिजे, तो येणेंप्रमाणें :—

" गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस किंवा इलाका सरकारास, मलिका माआझमांच्या सार्वभौम सत्तेखालीं असणाऱ्या कोणत्याही एतद्देशीय राजाच्या किंवा संस्थानाच्या मुलुकांत ज्या मनुष्यांस पुढें सांगितलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल कैदेची किंवा काळ्या पाण्यावर पाठविण्याची शिक्षा झाली असेल त्यांना, त्यांच्या त्याच्या शिक्षेच्या ठरावांत सांगितलेल्या मुदतीपर्यंत, प्रसंगाप्रमाणें, ब्रिटिश इंडियांतील कोणत्याही ठिकाणीं, किंवा इलाका सरकारच्या ताब्यांतील कोणत्याही ठिकाणीं स्वाधीन देण्याविषयीं, अटकावून ठेवण्याविषयीं किंवा कैदेंत ठेवण्याविषयीं हुकूम फर्माविण्याचा अधिकार आहे."

(२) त्याच कलमांत, " गुरें चोरणें " या शब्दांनंतर पुढील मजकूर दाखल केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें :—

" किंवा जें कृत्य ब्रिटिश इंडियांत केलें असतां, सन १८७९ चा परमुलुखांतील हुकुमांत आणि अपराध्यांस स्वाधीन करणें यांविषयींचा आक्ट, याच्या परिशिष्टांत हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींचा कायदा याचीं कलमें सांगितलीं आहेत त्यांपैकीं कोणत्याही कलमाविरुद्ध अपराध झाला असता, तसें (या कलमांत अपराध ह्मणून सांगितलेलें) दुसरें कोणतेंही कृत्य."

(३) त्याच कलमाच्या विशेष ठरावाबद्दल पुढील मजकूर दाखल केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें:—

" मात्र असें ठरविण्यांत येतें कीं सदरहू शिक्षेचे ठराव एकाद्या न्यायसभेपुढें इनसाफ होऊन सांगितलेले असले पाहिजेत; आणि अशा सभेंत अध्यक्षस्थानीं बसणारा जज्ज, किंवा या सभेंत एकाहून अधिक जज्ज असल्यास, त्यांपैकीं निदान एक जज्ज हा ब्रिटिश सरकारचा अमलदार असून, त्याला अशा जज्जाचें काम करण्यास सदरहू एतद्देशीय राजाकडून किंवा संस्थानाकडून किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांजकडून अधिकार मिळाला असला पाहिजे."

६. सदरहू आक्टाच्या ३० व्या कलमाच्या बदला पुढील कलम दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें :—

सन १८७१ चा आक्ट ५, याच्या ३० व्या कलमाबद्दल नवीन कलम दाखल करणें.

एकाच इलाका सरकारच्या ताब्यांतील मुलुकामध्यें एका जेलमधून दुसऱ्या जेलमध्यें पाठविणें.

"३०. जेव्हां कोणत्याही मनुष्यास कोणत्याही कोर्टाकडून कैदेची किंवा काळ्या पाण्यावर पाठविण्याची शिक्षा देण्यांत येईल किंवा देण्यांत आली असेल, किंवा स्वस्थता राखण्यासाठीं किंवा चांगली वर्तणूक ठेवण्यासाठीं तारण देण्यास चुकल्यामुळें सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याच्या १२३ व्या कलमाअन्वयें तुरुंगांत पाठविण्यांत आलें असेल किंवा अटकावून ठेवण्यांत येईल, तेव्हां इलाका सरकारास किंवा (त्याच्या हुकुमांस अनुसरून व त्याच्या निर्बंधांत राहून ) तुरुंगांचा इन्स्पेक्टर जनरल यास, सदरहू मनुष्याला, प्रसंगाप्रमाणें, ज्या मुदतीची कैदेची किंवा काळ्यापाण्यावर पाठविण्याची शिक्षा दिली असेल किंवा सदरहू प्रकारचें तारण देण्याविषयीं हुकूम झाला असेल त्या मुदतींत, त्यास अटकावून ठेवलेल्या जेलमधून किंवा जागेंतून त्याच इलाका सरकारच्या ताब्यांतील मुलुकांतल्या दुसऱ्या कोणत्याही जेलमध्यें किंवा अटकावून ठेवण्याच्या जागीं त्यास पाठविण्याविषयीं हुकूम करण्याचा अधिकार आहे."

७. सदरहू आक्टाच्या ३२ व्या कलमाच्या बदला पुढील कलम दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें :—

सन १८७१ चा आक्ट ५, याच्या ३२ व्या कलमाबद्दल नवीन कलम दाखल करणें.

कैदी एका इलाका सरकारच्या ताब्यांतील मुलुकांतून दुसऱ्या इलका सरकारच्या ताब्यांतील मुलुकांत पाठविणें.

" ३२. जेव्हां कोणत्याही मनुष्यास कोणत्याही कोर्टाकडून कैदेची किंवा काळ्या पाण्यावर पाठविण्याची शिक्षा देण्यांत येईल किंवा देण्यांत आली असेल, किंवा चांगली वर्तणूक ठेवण्यासाठीं तारण देण्यास चुकल्यामुळें सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याच्या १२३ व्या कलमाअन्वयें तुरुंगांत पाठविण्यांत आलें असेल किंवा अटकावून ठेवण्यांत येईल, तेव्हां गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस सदरहू मनुष्याला, प्रसंगाप्रमाणें, ज्या मुदतीची कैदेची किंवा काळ्या पाण्यावर पाठविण्याची शिक्षा दिली असेल किंवा सदरहू प्रकारचें तारण देण्याविषयीं हुकूम झाला असेल त्या मुदतींत, त्यास अटकावून ठेवलेल्या जेलमधून किंवा जागेंतून ब्रिटिश इंडियांतील दुसऱ्या कोणत्याही जेलमध्यें किंवा अटकावून ठेवण्याच्या जागीं त्यास पाठविण्याविषयीं हुकूम करण्याचा अधिकार आहे."

एस्. हार्वे जेम्स,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार

(True Translation.)

M. A. BAIG.
Oriental Translator to Government.

खालीं लिहिलेला मसुदा, हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांच्या कायदेकानू करणाऱ्या मंडळीमध्यें तारीख २२ माहे मार्च सन १८९४ रोजीं रुजू केला :—

---

# सन १८९४ चा नंबर ५.

## हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा व सन १८६४ चा आक्ट ६ हे सुधारण्याबाबदचा मसुदा.

ज्याअर्थी हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा व सन १८६४ चा आक्ट ६ हे सुधारणें योग्य आहे, त्याअर्थी पुढीलप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

### हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा.

सन १८६० चा आक्ट ४५, याच्या १८२ व्या कलमाबद्दल नवीन कलम दाखल करणें.

१. हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा याच्या १८२ व्या कलमाच्या बदला पुढील कलम दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें:—

सरकारी नौकरानें आपणास कायद्यावरून मिळालेल्या अधिकारानें दुसऱ्याचें नुकसान करावें या इराद्यानें त्यास खोटी खबर देणें.

"१८२ जो कोणी मनुष्य जी कोणतीही खबर खोटी असल्याचें आपणास माहीत असून किंवा वाटत असून ती कोणत्याही सरकारी नौकरास देईल व ती देण्यामध्यें त्याचा इरादा अशा सरकारी नौकरानें—

(अ) ज्या गोष्टीसंबंधीं अशी खबर दिली असेल त्या गोष्टीची खरी स्थिति त्याला समजली असतां जी गोष्ट त्यानें करूं नये किंवा वर्जूं नये तशी कोणतीही गोष्ट करावी किंवा वर्जावी, किंवा

(ब) त्यास कायद्यानें मिळालेल्या कोणत्याही अधिकाराचा किंवा अखत्यारीचा उपयोग अशी खोटी खबर देणाराच्या फायद्याकरितां, ती खबर मिळाली नसती तर ज्या रीतीनें त्यानें केला नसता, त्या रीतीनें करावा, किंवा

(क) त्यास कायद्यानें मिळालेल्या अधिकाराचा त्यानें कोणत्याही मनुष्याचें नुकसान किंवा कोणत्याही मनुष्यास त्रास होई अशा रीतीनें उपयोग करावा,

असा असेल, किंवा आपण तशी खबर दिल्यानें सदरहू सरकारी नौकराकडून सदरीं सांगितल्याप्रमाणें घडून येण्याचा संभव आहे असें त्यास माहीत असेल, तर त्यास दोन प्रकारांपैकीं कोणत्याही एका प्रकारच्या कैदेची शिक्षा दिली पाहिजे, व ही कैद सहा महिनेपर्यंत ठरविण्याचा अख्त्यार आहे, किंवा त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे, व हा दंड एक हजार रुपयांपर्यंत करण्याचा अख़्त्यार आहे, किंवा या दोन्हीं शिक्षा दिल्या पाहिजेत.

"**व्याख्या.**—रकम (क) हिच्या कारणाकरितां, अमुक मनुष्याचें नुकसान करण्याचा किंवा अमुक मनुष्यास त्रास देण्याचा खबर देणाराचा इरादा होता असें दाखविण्याची जरुरी नाहीं, सदरीं सांगितल्या प्रकारची खबर मिळाल्याचा वाजवी व स्वाभाविक परिणाम सदरहू सरकारी नौकर कोणत्या तरी मनुष्याचें किंवा मनुष्यांचें नुकसान होई किंवा त्यांस त्रास होई अशा रीतीनें वागेल, असा होण्यासारखा असला तरी पुरे आहे.

"**उदाहरणें.**

"(अ) **अ** हा, एका माजिस्ट्रेटाच्या ताब्यांतील पोलीस अमलदार **झ** यानें आपल्या कामगिरीमध्यें हयगई केली किंवा त्यानें गैरवर्तणूक केली अशी त्या माजिस्ट्रेटास खबर देतो, आणि त्यास ही खबर खोटी असल्याचें व तिजवरून असा माजिस्ट्रेट झला बरतरफ करील असा संभव असल्याचें माहीत आहे. तर **अ**नें या कलमांत सांगितलेला अपराध केला.

"(ब) **अ** हा, झनें सरकारच्या मनाईचें मीठ एका गुप्त ठिकाणीं ठेविलें आहे अशी एका सरकारी नौकरास खोटी खबर देतो, आणि त्यास ही खबर खोटी असल्याचें व तिजवरून झच्या घरादाराचा झाडा घेतला जाऊन झला त्रास होण्याचा संभव असल्याचें माहीत आहे. तर **अ**नें या कलमांत सांगितलेला अपराध केला.

"(क) **अ** हा, अमुक गांवाजवळ कोणीं आपल्या आंगावर येऊन आपली चोरी केली ह्मणून एका पोलीसच्या शिपायास खोटी खबर देतो, परंतु आपल्या आंगावर येणारांमध्यें अमुक मनुष्य होता असें कोणत्याही मनुष्याचें नांव सांगत नाहीं. अशी खबर दिल्यामुळें स्वाभाविक रीत्या पोलिसाकडून सदरहू गांवामध्यें चौकशी करण्यांत येते व झाडा घेण्यांत येतो, व त्याच्या योगानें तेथील गांवकऱ्यांस किंवा त्यांपैकीं कित्येकांस त्रास होतो. तर **अ**नें या कलमाअन्वयें अपराध केला.

"(ड) **अ** हा, एका कोर्टांत आपलें नांव प्लीडर ह्मणून दाखल होण्यासाठीं अर्ज करितो, आणि आपल्या अर्जाच्या पुष्टीसाठीं, दुसऱ्या एका कोर्टांत आड्व्होकेट ह्मणून आपलें नांव दाखल झालें आहे असें लेखी किंवा इतर रीतीनें खोटें सांगतो. असें करण्यामध्यें त्याचा इरादा, लाभाकरितां किंवा बक्षिसाकरितां प्लीडरचा धंदा चालविण्यास अधिकार मिळावा हा आहे. तर **अ**नें या कलमाअन्वयें अपराध केला."

सन १८६० चा आक्ट ४५, याच्या १२ व्या बाबींत जास्त कलम दाखल करणें.

२. सदरहू कायद्याच्या १२ व्या बाबीच्या शेवटीं पुढील कलम दाखल केलें पाहिजे तें येणेंप्रमाणें:—

खोट्या स्टांपाची मनाई.

"२६३ अ. (१) जो कोणी—

(अ) कोणताही खोटा स्टांप करील, जाणूनबुजून तो चालवील, त्याचा धंदा करील किंवा तो विकील, किंवा कोणताही खोटा स्टांप टपालाच्या कोणत्याही कामाला लावील, किंवा

(ब) कोणताही खोटा स्टांप कायदेशीर सबबीवांचून कबज्यांत ठेवील, किंवा

(क) कोणताही खोटा स्टांप करण्याकरितां कोणताही शिक्का, पत्रा, साधन किंवा पदार्थ करील, किंवा कायदेशीर सबबीवांचून कबज्यांत ठेवील,

त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे, व हा दंड दोनशें रुपयांपर्यंत करण्याचा अखत्यार आहे.

"(२) सदरहू प्रकारचा कोणताही स्टांप, किंवा तसा कोणताही स्टांप करण्याकरितां कोणत्याही मनुष्याच्या कबज्यांत असणारा सदरहू प्रकारचा कोणताही शिक्का, पत्रा, साधन किंवा पदार्थ धरण्याचा अधिकार आहे, व ते गुन्हेगारीबद्दल सरकारांत जमा होतील असें समजावें.

"(३) या कलमांत—

(अ) 'खोटा स्टांप' याचा अर्थ, टपालाचा एकादा दर दर्शविण्याकरितां सरकारानें काढल्यासारखा खोट्या रीतीनें दिसणारा कोणताही स्टांप, किंवा त्या कारणाकरितां सरकारानें काढलेल्या कोणत्याही स्टांपाची कागदावर किंवा इतर रीतीनें केलेली हुबेहूब नकल, किंवा अनुकृति किंवा प्रतिमा असा समजावा: आणि

(ब) 'सरकार' याचा अर्थ, १७ व्या कलमांत कसाही ठराव असला तथापि ज्या मनुष्यास किंवा मनुष्यांस ब्रिटिश इंडियाच्या कोणत्याही भागांतच नव्हे, तर मलिका माआझमांच्या राज्याच्या कोणत्याही भागांत किंवा कोणत्याही परकी देशांत राज्याधिकार चालविण्याचा अधिकार कायद्यानें मिळाला असेल तो मनुष्य, किंवा ते मनुष्य असा समजावा.

३. सदरहू कायद्याच्या २९४ व्या कलमाच्या बदला पुढील कलम दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें:— सन १८६० चा आक्ट ४५, याच्या २९४ व्या कलमाबद्दल नवीन कलम दाखल करणें.

"२९४. जो कोणी, सार्वजनिक जागेंत किंवा जागेजवळ, दुसऱ्यांस त्रास होई अशा रीतीनें, कोणतेंही बीभत्स कृत्य करील, किंवा कोणतेंही तसें गाणें गाईल, किंवा तशी लावणी ह्मणेल किंवा तसे शब्द उच्चारील, त्यास दोन प्रकारांपैकीं कोणत्याही एका प्रकारच्या कैदेची शिक्षा दिली पाहिजे, व ही कैद तीन महिनेपर्यंत ठरविण्याचा अधिकार आहे, किंवा दंडाची शिक्षा दिली पाहिजे, किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत." बीभत्स कृत्यें व गाणीं. [या सुधारणेचा, मद्रास इलाख्यांत झालेल्या व रिपोर्टांत दाखल न झालेल्या एका मुकद्दम्याशीं संबंध आहे.]

४. सदरहू कायद्याच्या ४७७ व्या कलमानंतर पुढील कलम दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें:— सन १८६० चा आक्ट ४५, याच्या ४७७ व्या कलमानंतर नवीन कलम दाखल करणें.

"४७७ अ. जो कोणी, कारकून, अमलदार किंवा नौकर असून, किंवा कारकुनाच्या, अमलदाराच्या किंवा नौकराच्या कामावर लावलेला असून, किंवा त्याचें काम करीत असून, आपणास नौकरीस ठेवणाराचें किंवा त्याच्या कबज्यांत असणारें, किंवा आपणास नौकरीस ठेवणाराकरितां किंवा त्याच्या वतीनें आपणांकडे आलेलें कोणतेंही बुक, कागद, लेख, किंमतीचें तारण किंवा हिशोब याचा, बुद्ध्या व कपटाच्या इराद्यानें, नाश करील, त्यांत फेरफार करील, तीं छिन्नविच्छिन्न करील किंवा खोटीं हिशोब खोटा करणें.

होत असें करील, किंवा असें कोणतेंही बूक, कागद, लेख, किंमतीचें तारण किंवा हिशोब यांत किंवा यांतून, बुद्ध्या व कपटाच्या इराद्यानें, कोणतीही खोटी नोंद करील किंवा करण्यास अनुमत देईल, किंवा कोणतीही मुद्याची बाबत गाळील किंवा फिरवील किंवा गाळण्यास किंवा फिरविण्यास अनुमत देईल, त्यास दोन प्रकारांपैकीं कोणत्याही एका प्रकारच्या कैदेची शिक्षा दिली पाहिजे, व ही कैद सात वर्षेंपर्यंत ठरविण्याचा अख़त्यार आहे, किंवा दंडाची शिक्षा दिली पाहिजे, किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत.

"व्याख्या.—या कलमाखालील कोणत्याही चार्जमध्यें कपट करण्याचा सामान्य इरादा लिहिणें पुरें आहे, अमुक मनुष्याच्या संबंधानें किंवा पैक्याच्या अमुक रकमेच्या संबंधानें कपट करण्याचा इरादा होता असें न लिहिलें तरी चालेल."

**सन १८६४ चा आक्ट ६.**

सन १८६४ चा आक्ट ६, यांत जास्त कलम दाखल करणें.

९. सन १८६४ चा आक्ट ६ (फटके मारण्याची शिक्षा कांहीं प्रसंगीं ठरविण्याचा अधिकार देण्याविषयीं आक्ट) याच्या ६व्या कलमानंतर पुढील कलम दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें:—

व्याख्या.

"७. (१) या आक्टाचीं कलमें ३ व ४ यांत 'तसेच गुन्ह्याची' या शब्दांमध्यें, पुनः शाबीत झालेला गुन्हा ज्यां गोष्टी मिळून बनतो त्या गोष्टींपैकीं कांहीं किंवा कोणत्याही गोष्टींच्या मिलाफानें होणाऱ्या हलक्या गुन्ह्याचा समावेश होतो असें समजावें.

"(२) या आक्टाच्या ९व्या कलमांत 'अल्पवयी गुन्हेगार' या संज्ञेचा अर्थ, जो गुन्हेगार कोर्टाच्या मतें सोळा वर्षांच्या आंत असेल तो गुन्हेगार असा समजावा, आणि या बाबतींत कोर्टाचें मत अखेरचें व निरुत्तर होय असें समजावें."

---

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

प्रस्तुत मसुद्याच्या २ऱ्या कलमाचा उद्देश, व्हियेना पोस्टल कन्व्हेन्शन [व्हियेना येथें झालेला टपालसंबंधीं करारनामा] सन १८९२च्या जुलै महिन्याच्या १ ल्या तारखेस अमलांत आला त्यांतील ठरावांप्रमाणें वहिवाट व्हावी, हा आहे, या मसुद्याच्या इतर कलमांचा खुलासा, त्यांच्या बाजूस रकान्यांत टिपा दिल्या आहेत त्यांवरून होईल. कलम ४ हें स्थानिक सरकारें व चेंबर आफ कामर्स नामक मंडळ्या यांस चालू कायद्यांत कांहीं उणीव वाटून त्यांनीं केलेल्या शिफारसीवरून दाखल केलें आहे.

तारीख २१ माहे मार्च सन १८९४.

ए. इ. मिलर.

एम्. हॉर्व जेम्स,

सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True Translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

# ACT No. X of 1894.

## हिंदुस्थान सरकार.

### लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

**हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल ह्यांनीं तारीख २९ माहे मार्च सन १८९४ रोजीं मंजूर केला तो लोकांस जाहीर होण्यासाठीं ह्यावरून प्रसिद्ध केला असेः—**

### सन १८९४ चा आक्ट १० वा.

### सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याचे रीतीविषयींचा कायदा सुधारण्याकरितां आक्ट.

सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याचे रीतीविषयींचा कायदा सुधारणें ज्या अर्थी इष्ट आहे, त्या अर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहेः—

सन १८८२ चा आक्ट १० वा, कलम ४४, ह्याची सुधारणा.

१. सदर्हू कायद्याच्या ४४ व्या कलमांत, "१३०" हा आंकडा आणि "३०२" हा आंकडा ह्यांच्या दरम्यान, "१४३, १४४, १४५, १४७, १४८" हे आंकडे दाखल करावे.

सन १८८२ चा आक्ट १० वा, ह्याच्या ४५ व्या कलमाची सुधारणा आणि त्यानंतर एक कलम जास्त दाखल करणें.

२. (१) सदर्हू कायद्याच्या ४५ व्या कलमाच्या ज्या भागाच्या सुरवातीस "प्रत्येक गांवच्या मुख्यानें" हे शब्द असून अंतीं "मेला आहे ही गोष्ट" हे शब्द आहेत, त्याच्या ऐवजीं खालील मजकूर दाखल करावाः तो मजकूर येणेंप्रमाणेः—

गांवचे मुख्य, कुळकर्णी, जमीन धारण करणारे व इतर ह्यांनीं कित्येक गोष्टींबाबद रिपोर्ट केला पाहिजे.

"४५. प्रत्येक गांवच्या मुख्यानें, गांवच्या कुळकर्ण्यानें, गांवच्या जागल्यानें, गांवच्या पोलीस-अमलदारानें, जमिनीच्या मालकानें किंवा वहिवाट करणारानें, व अशा मालकाच्या किंवा वहिवाट करणाराच्या मुख्त्यारानें, आणि सरकार तर्फे अगर कोर्ट आफ वार्डस तर्फे महसूल किंवा जमिनीचे खंड वसूल करण्याच्या कामावर ज्या ज्या अमलदारास नेमिलें असेल त्या त्या अमलदारानें, खालीं लिहिलेल्या गोष्टींबाबद त्यास जी बातमी लागेल ती, अगदीं जवळचा माजिस्ट्रेट किंवा अगदीं जवळचें पोलीस-ठाणें स्वाधीन असणारा अमलदार, यांतून जो अधिक जवळ असेल त्यास, तत्काळ दिली पाहिजेः—

(अ) तो ज्या कोणत्याही गांवचा मुख्य, कुळकर्णी, जागला किंवा पोलीस-अमलदार असेल, किंवा ज्या गांवांत त्याची जमीन असेल, किंवा तो जमिनीची वहिवाट करीत असेल, किंवा मुखत्यार असेल किंवा महसूल किंवा खंड वसूल करीत असेल, त्या गांवांत चोरीचा माल घेणाऱ्या किंवा विकणाऱ्या कोणत्याही महशूर मनुष्याचें कायमचें किंवा हंगामी राहणें आहे ही गोष्ट;

(ब) जो कोणताही मनुष्य ठग असल्याचें, जबरीची चोरी करणारा असल्याचें, अपराधाची शाबिती झालेला कैदी असून पळालेला असल्याचें किंवा अपराधी असल्याबद्दल जाहिरनामा ज्याविषयीं लागला आहे असा असल्याचें त्यास माहीत असेल किंवा तसा त्यास ज्याविषयीं वाजवी रीतीनें वहीम असेल, तो सदर्हू गांवांतील कोणत्याही जागीं येतो किंवा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जात असतां त्या गांवांमधून जातो ही गोष्ट;

(क) सदर्हू गांवांत किंवा गांवाजवळ, जामीन न घेण्याजोगा किंवा हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याबाबद कायदा ह्याच्या १४३, १४४, १४५, १४७, अगर १४८ कलमाअन्वयें शिक्षा होण्याजोगा अपराध करणें किंवा करण्याचा इरादा असणें ही गोष्ट;

(ड) सदर्हू गांवांत अगर गांवाजवळ कोणी मनुष्य अकस्मात किंवा अस्वाभाविक रीतीनें मरण पावला आहे किंवा संशय येण्यासारखी हकीकत असून मेला आहे ही गोष्ट;"

(२) त्याच कलमांत, सन १८९४ च्या ३ऱ्या आक्टाच्या २ऱ्या कलमावरून जास्त दाखल केलेल्या (इ) रकमेनंतर खालील मजकूर दाखल करावाः तो मजकूर येणेंप्रमाणें :—

"(फ) बंदोबस्त राखण्याच्या कामीं किंवा अपराधाचा प्रतिबंध करण्याच्या कामीं व्यत्यय येण्याचा अगर लोकांच्या किंवा मालमत्तेच्या सलामतीस धोका पोंचण्याचा ज्या गोष्टीवरून संभव आहे अशा ज्या गोष्टीच्या संबंधानें बातमी देण्याविषयीं जिल्हा माजिस्ट्रेटानें स्थानिक सरकारच्या आगाऊ मंजुरीनिशीं केलेल्या साधारण अगर विशेष हुकुमानें त्यास फर्माविलें असेल, ती गोष्ट."

(३) त्याच कलमानंतर खालील कलम दाखल करावें; तें येणेंप्रमाणें:—

४५व्या कलमाच्या कारणांसाठीं किती एक बाबतींत जिल्हा माजिस्ट्रेटांनीं गांवचे मुख्य नेमण्याबाबद.

"४५ अ. ज्या कोणत्याही गांवाकरितां इतर कोणत्याही कायद्याअन्वयें गांवचा मुख्य नेमिला नसेल त्या गांवांत सदरील शेवटल्या कलमाच्या कारणांसाठीं वेळोवेळीं एक अगर अधिक माणसांस गांवचे मुख्य नेमण्याचा जिल्हा माजिस्ट्रेटास अखत्यार आहे; मात्र अशी नेमणूक, स्थानिक सरकार ह्याबाबतींत ज्या कानू करील त्यास अनुसरून केली पाहिजे.

एस्. हार्वे जेम्स,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True Translation.)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.